# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
## सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१-०९

ई मेल jtdir.nagpur@dvet.gov.in website https://nagpur.dvet.gov.in फोन क्र ०७१२/२५६५५५५,२५६०८२३ फॅक्स क्र २५६१४०३


**परिपत्रक**

क्रमांक :- का-१(१)अ/आस्था/अकंपा/प्रसूची/२०१९/ 798

दिनांक :- - 1 FEB 2019

विषय :- **दिवगंत कर्मचां-याच्या वारसास अनुकंपा तत्त्वावर गट-क व गट-ड संवर्गात नियुक्ती देण्याबाबत करावयाची प्राथमिक कार्यवाही.**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, अकंपा१२१७/प्र.क्र.१०२/ आठ,दि.२१.०९.२०१७

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, अकंपा१२१८/प्र.क्र.०१/ आठ,दि.१५.०२.२०१८

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, अकंपा१२१७/प्र.क्र.१०२/ आठ,दि.०४.०८.२०१८

महोदय,

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था/कार्यालयातील सेवेत असतांना दिवगंत झालेल्या शासकीय कर्मचां-याच्या पात्र कुंटुबियांना अनुकंपा तत्त्वावर त्यांच्या शैक्षणिक अर्हतेस अनुसरुन गट क व गट ड संवर्गात नियमानुसार शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी दिंनाक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत दिवगंत झालेल्या कर्मचां-याच्या वारसदाराकडून प्राप्त झालेल्या व उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीची पुर्तता करीत असलेल्या परीपूर्ण प्रस्तावानुसार कर्मचारी दिवगंत झाल्याच्या दिनांकान्वये प्राथमिक क्रमाने दरवर्षी दि.३१ डिसेंबर अखेर तात्पुरती प्रतिक्षा सूची प्रसिध्द करण्यात येते.

वारवांर सूचित करुन सुध्दा या कार्यालयाच्या असे निर्दशनास येत आहे की, दिवगंत झालेल्या काही कर्मचां-याच्या वारसदांरानी याबाबत अपूर्ण माहिती किंवा काहीच माहिती नसल्यामुळे ते शासन निर्णयातील तरतुदीनुसार विहीत कालावधीत प्रस्ताव या कार्यालयास सादर न करणे, प्रस्ताव अपूर्ण असणे, नमुन्यात प्रस्ताव नसणे, प्रस्तावासोबत आवश्यक ते दस्तावेज सहपत्रित न करणे किंवा प्रस्ताव योग्य चाकोरीतून (कार्यालय/संस्था प्रमुखामार्फत) सादर न करणे इत्यादी व अनेक त्रृटी असलेले प्रस्ताव या कार्यालयास सादर केले जातात.

..२..

<u>वरील संदर्भियातील दि.२१.०९.२०१७ च्या शासन निर्णयातील अ.क्र.७(अ) नुसार कार्यालय/संस्था प्रमुख यांनी शासकीय कर्मचां-याच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुंटुबियांना सदर योजनेची त्वरीत माहिती उपलब्ध करुन देणे तसेच सदर माहिती मिळाल्याबाबत पोच घेणे आवश्यक आहे.</u>

तरी यापुढे दिवगंत कर्मचां-याच्या पात्र वारसदारास नियमानुसार अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी सादर करावयाचा प्रस्ताव संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार विहीत मुदतीत (वारसदार सज्ञान असल्यास कर्मचारी दिवगंत झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत तर वारसदार अज्ञान असल्यास त्यांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केल्याच्या तारखेपासून एक वर्ष मुदतीच्या आत), विहीत नमुन्यात व सर्व दस्ताऐवजासह सादर होईल याची संबधित कार्यालय/संस्था प्रमुख तसेच नियमानुसार अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी पात्र असलेल्या वारसदारांनी दक्षता घ्यावी.

परिपत्रकातील निर्देश व शासन निर्णयातील तरतुदीचे पालन न झाल्यास व त्याअनुंषगाने कार्यालय प्रमुख / संस्था प्रमुख यांच्यातर्फे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे पडताळणी अंती नियमानुसार अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी वारसदार अपात्र ठरल्यास अथवा प्रस्तावासोबत अपूर्ण माहिती / दस्तावेज प्राप्त झाल्यास त्यास संस्था / कार्यालय प्रमुख यांना वरील संदर्भियातील दि.२१.०९.२०१७ च्या शासन निर्णयानुसार जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**तसेच दिवगंत कर्मचां-याच्या पात्र वारसदारास नियमानुसार अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावाचा विहीत नमूना (परिशिष्ट `ब`) तसेच प्रस्तावासोबत आवश्यक असलेल्या दस्तऐवजाची सूची या परिपत्रकासह या कार्यालयाच्या <u>https://nagpur.dvet.gov.in</u> सकेंत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.**

**सहपत्र - वरीलप्रमाणे**

( सी. ए. निनाळे )
सहसंचालक,

<u>प्रतिलिपी माहितीस सविनय सादर</u>

१. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई (कार्यासन क्र.०४)

<u>प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित</u>

२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी नागपूर/वर्धा/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली
३. या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व प्राचार्य, औ.प्र.संस्था, सर्व मुख्याध्यापक, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा केंद्र व सर्व प्रकल्प अधिकारी शा.आ.आ.औ.प्र.संस्था.

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१-०९**

ई मेल jtdir.nagpur@dvet.gov.in website https://nagpur.dvet.gov.in फोन क्र ०७१२/२५६५५५५,२५६०८२३ फॅक्स क्र २५६१४०३

**अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी प्रस्ताव सादर करतांना सादर करावयाची कागदपत्रे**

१) कर्मचारी सेवेत असल्याबाबत सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाचा उतारा.
२) अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतचा अर्ज **परिशिष्ठ-ब** या विहीत नमून्यात सादर करावा.
३) अर्ज योग्य चाकोरीतून सादर करावा.
४) दवंगत कर्मचाऱ्याचे मृत्यू प्रमाणपत्र.
५) मागणी केलेले पद वर्ग- "क" वा "ड " नमूद करणे आवश्यक आहे.
६) शैक्षणिक पात्रते बाबत आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्राच्या प्रती स्वाक्षांकित करुन जोडणे आवश्यक .
७) दिवंगत कर्मचा-यांचे वारसदाराचे वारसान प्रमाणपत्र. **(रु. २० चे स्टॅम्प पेपरवर) मूळ प्रतीत जोडण्यात यावे.**
८) अज्ञान वारसदार सज्ञान झाल्याबाबत जन्माचा दाखला आवश्यक .
९) कर्मचा-याची सविस्तर मालमत्तेची माहिती सादर करावी.
१०) कुटुंबात इतर सदस्य नोकरीत असल्यास त्याबाबतची माहिती. **(रु. २० चे स्टॅम्प पेपरवर) मूळ प्रतित जोडणे आवश्यक .**
११) कुटूबांच्या उत्पन्नाबाबत तलाठयाचे प्रमाणपत्र व अर्जदाराचे उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र आवश्यक.
१२) **परिशिष्ट -"ब" भाग -१ मधील प्रतिज्ञापत्राचा लेख** रु. २० चे स्टॅम्प पेपरवर **मूळ प्रतीत स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक.**
१३) कार्यालय प्रमुखाचे स्वतःचे सहीचे शिफारसपत्र प्रस्तावासोबत आवश्यक .
१४) रु.२० चे स्टॅम्प पेपरवर कुटुंबातील इतर वारसदारांचे अर्जदारास अनुकंपा तत्वावर नोकरी देणेबाबत **मूळ संमतीपत्र** प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक.
१५) सक्षम अधिका-याचे जातीचे प्रमाणपत्र आवश्यक .
१६) सज्ञान म्हणून वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्याबाबत जन्मतारखेचा पुरावा / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
१७) कायमचा व पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिन कोडसह नमूद करणे आवश्यक.
१८) वारसदाराने केलेल्या अर्जावर तारखेची नोंद असणे आवश्यक आहे.
१९) अर्जदाराच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली नसल्यास वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर त्या पुढील एक वर्षाच्या आत प्रस्ताव सादर करणे आवश्यक .

## परिशिष्ट 'ब'

(शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

**शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)**

**भाग-१**

१. (अ) दिवंगत अधिकारी/कर्मचा-याचे नांव:-
(ब) कर्मचा-याचे पदनाम:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) मृत्यूचा दिनांक/कायमस्वरुपी जायबंदी झाल्याचा दिनांक:-
(इ) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक:-

२. (अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे त्या व्यक्तीचे नांव:-
(ब) त्याचे/तिचे कर्मचा-याशी नाते:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) शैक्षणिक अर्हता:-
(इ) कुटुंबियांपैकी दुस-या कोणा कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय ?:-

३. स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम:-
(अ) कुटुंब निवृत्तीवेतन-
(ब) स्थावर मालमत्तेपासूनचे वा इतर मासिक उत्पन्न-
(क) मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान-
(ड) भविष्यनिर्वाह निधीतील बचत-
(इ) ठेव संलग्न विमा योजना-
(फ) गट विमा योजना-
(ग) आयुर्विम्याची रक्कम-

---

एकूण रक्कम-

४. शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचा तपशील (त्यापैकी कोणी नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन याबाबतची माहिती)

| अ.क्र. (१) | नांव (२) | शासकीय कर्मचा-याशी नाते व वय (३) | नोकरी /व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन्न (४) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजुतीप्रमाणे ख-या आहेत. वरील बाबींपैकी एक बाब जरी भविष्यात खोटी किंवा चुकीची आढळली तर माझी नियुक्ती समाप्त करण्यात यावी.

दिनांक-

उमेदवाराची सही.

श्री./श्रीमती ........................................................ हे माझ्या परिचयाचे असून त्यांनी नमूद केलेल्या बाबी ख-या आहेत.

दिनांक:-

स्थायी शासकीय कर्मचा-याची सही व पत्ता

## भाग-२

१ (अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नांव:-

(ब) त्याचे/तिचे शासकीय अधिकारी/कर्मचा-याशी नाते:-

(क) शैक्षणिक अर्हता, वय (जन्मतारीख), अनुभव (काही असल्यास):-

(ड) ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व कार्यालयाचे नांव:-

२. उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांक:-

३. विभाग प्रमुख/विभागाची शिफारस:-

४. उमेदवाराचे प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्यांचा खुलासा:-

मी उमेदवाराने नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी तपासल्या आहेत.

दिनांक-
ठिकाण-

आस्थापना अधिका-यांची सही,
नांव व पत्ता